सबसे 'तेज' ग्लोबल महातेज...!

Postal Regd. No. JAL/443/2025-2027

# ग्लोबल महातेज

https://epaper.globalmahatej.com/

RNI. NO. MAHBIL /25/A0192

वर्ष १ ले | अंक : २६१ | शनिवार, दि. १३ जून २०२६ | पाने : ४ | अमळनेर | किंमत : ३ रुपये | Email - globalmahatej@gmail.com

**रवि ज्वेलर्स**
सराफ बाजार, अमळनेर.
मो. ७०७४७४२१२१
**सोने-चांदी**
**आजचे भाव**
२४ Ct सोने ९९.५०% : ₹ १४७२००
२२ Ct सोने ९१.६०% : ₹ १३६२००
१८ Ct सोने ७५.००% : ₹ ११२२००
शुद्ध चांदी ९९९% : ₹ २४३०/-
भाव प्रती १० ग्राम

आजचे **अभीष्टचिंतन**


**श्री. लक्ष्मीकांत सोनार**
सोशल मिडीया आर्टिस्ट


**श्रीमती उज्ज्वलाताई शहा**
सेवानिवृत्त मुख्याध्यापिका


**सौ. मीनाताई शहा**
अमळनेर


**श्री. सचिन चव्हाण**
अमळनेर


**श्री. अविनाश अमृतकर**
अमळनेर



अमळनेर : 'देऊळ बंद २' चे दिग्दर्शक व अभिनेते प्रवीण तरडे, निर्माते कैलास वाणी यांनी शुक्रवार, दि. १२ जून रोजी श्री मंगळग्रह देवांचे दर्शन घेतल्यानंतर त्यांचा सत्कार करताना मंगळग्रह सेवा संस्थेचे खजिनदार गिरीश कुलकर्णी, सहसचिव दिलीप बहिरम, विश्वस्त डी. ए. सोनवणे, मंगल सेवेकरी प्रकाश मेखा, विनोद कदम, बाळा पवार, आर. टी. पाटील, महेश कोठावदे, कैलास महाजन, शरद कुलकर्णी (छायाचित्रे : नितेश बारी, मयूर चौधरी व नितीन सोनवणे)

# 'देऊळबंद २' चे दिग्दर्शक व निर्मात्यांकडून श्री मंगळग्रह देवांचे दर्शन

## मंदिराचा स्वच्छ, सुंदर परिसर आणि नियोजनबद्ध व्यवस्थापनाचे केले कौतुक

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : "ते आले, त्यांनी पाहिले आणि येथील भक्तीभावाने व शिस्तीने त्यांचे मन जिंकून घेतले..." अशीच काहीशी प्रचिती शुक्रवार, दि. १२ जून रोजी येथील अतिप्राचीन, अतिजागृत, अतिदुर्मिळ जागृत श्री मंगळग्रह मंदिरात पाहायला मिळाली. संपूर्ण महाराष्ट्रात सध्या प्रचंड गाजत असलेल्या "देऊळबंद २आता परीक्षा देवाची "या चित्रपटाच्या प्रमोशननिमित्त अमळनेर येथे चित्रपटाचे ख्यातनाम दिग्दर्शक व अभिनेते प्रवीण तरडे आणि निर्माते कैलासबापू वाणी आले होते. यावेळी यांनी श्री मंगळग्रह मंदिरात येऊन देवतेचे अत्यंत भक्तीभावाने दर्शन घेतले.



**मित्राच्या आग्रहाखातर भेट, पण व्यवस्थापनाने जिंकले मन!**

मंदिरात त्यांचे अनुभव सांगताना दिग्दर्शक प्रवीण तरडे कमालीचे भावूक झाले होते. ते म्हणाले, की "अमळनेर येथील मूळ रहिवासी असलेले माझे मित्र राजेश पांडे यांनी मला स्पष्ट शब्दांत सांगितले होते की, अमळनेरला जाऊन आमच्या श्री मंगळग्रह देवतांचे दर्शन घेतले नाही, तर पुण्यात पाय ठेवू देणार नाही! त्यांच्या याच प्रेमापोटी आणि आग्रहाखातर आम्ही इथे आलो. परंतु, मंदिरात आल्यानंतर येथील जे वातावरण पाहिले, त्याने माझे मन प्रफुल्लित झाले. मला येथे मानसिक शांतता लाभली." श्री.तरडे यांनी मंदिर प्रशासनाच्या शिस्तीचे तोंडभरून कौतुक केले. मंदिरातील तरुण पुजारी यांचे एकसारखे आणि नीटनेटके सोवळे, सर्व सेवेकरी-कर्मचाऱ्यांचा शिस्तबद्ध पेहराव आणि संपूर्ण मंदिर परिसरात असलेली कमालीची स्वच्छता ,हिरवळ पाहून त्यांनी विश्वस्त मंडळाचे तोंड भरून कौतुक केले . प्रवीण तरडे यांनी स्वतः मंदिरात पारंपरिक सोवळे परिधान करून श्री मंगळग्रह देवाचे दर्शन घेऊन मंदिराच्या शिस्तीचे पालन केले. 'देऊळबंद २' च्या यशासाठी प्रार्थना केली.

**सामाजिक बांधिलकी : चित्रपटाच्या कमाईतून शेतकऱ्यांच्या मुलांना मदत**


खानदेश चे सुपुत्र निर्माते कैलासबापू वाणी यांनी सांगितले की व्यावसायिक गणितांच्या पलीकडे जाऊन चित्रपटसृष्टीने सामाजिक भान कसे जपावे, याचा आदर्श. 'देऊळबंद २' या चित्रपटातून पहावयास मिळणार आहे.चित्रपटातून मिळणाऱ्या कमाईचा एक मोठा भाग हा आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या मुलांच्या शिक्षणाकरिता खर्च करण्याचा मानस त्यांनी व्यक्त केला. तसेच देऊळबंद चित्रपटाचे ११ भाग येणार आणि त्यात प्रवीण तरडे असतील असेही त्यांनी स्पष्ट केले.त्यांच्या या संवेदनशील निर्णयाचे मंदिर प्रशासन आणि उपस्थित भाविकांकडून टाळ्यांच्या कडकडाटात स्वागत करण्यात आले.याप्रसंगी मंदिर व्यवस्थापन समिती, मंदिराचे पदाधिकारी आणि स्थानिक ग्रामस्थांच्या वतीने चित्रपटाच्या संपूर्ण टीमचा सत्कार करण्यात आला. चित्रपटाच्या अफाट यशासाठी सर्वांनी त्यांना शुभेच्छा दिल्या.

यावेळी मंगळग्रह सेवा संस्थेचे सहसचिव दिलीप बहिरम, खजिनदार गिरीश कुलकर्णी, जनसंपर्क अधिकारी शरद कुलकर्णी, विश्वस्त डी.ए.सोनवणे, खा. शि. मंडळाचे अध्यक्ष विनोद अग्रवाल, जयनील फाउंडेशनचे अध्यक्ष गौतम पाटील , सचिव वासू पाटील, अनुप गोरे, गजानन मालपुरे, लाड शाखीय वाणी समाज पंच मंडळाचे अध्यक्ष नितीन भदाणे,स्वामी समर्थ केंद्राचे सेवेकरी जगदीश पाटील, महेश कोठावदे, मिंटू बारी व स्वामी समर्थ केंद्राचा परिवार,शाम पुरकर,रवी भोई (बॉडीगार्ड),रिलस्टार चेतन छावा, पिळोदा वि.सो. चे चेअरमन विलास कुलकर्णी, सौ. मेघा कुलकर्णी, वरूण पाटील, दर्शन पाटील, वेद पाटील, योगराज पाटील, किशोर महाजन, सनी गायकवाड, मनीष पाटील, ज्ञानदीप सांगोरे, सचिन पाटील, रोहित शिसोदे, भूषण लोहार, मंगल सेवेकरी अनिल कदम, विनोद कदम, प्रकाश मेखा, आशिष चौधरी, गोरक्षनाथ चौधरी, मनोहर पाटील, आर.टी.पाटील, बाळा पवार, श्री मंगळग्रह मंदिर सेवेकरी व भाविक आदी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### दै. 'ग्लोबल महातेज' चे कौतुक

आजच्या काळात वाचकांना फक्त बातम्या नको असतात, तर त्यातून ज्ञान आणि मनोरंजन या दोन्ही गोष्टी हव्या असतात. 'ग्लोबल महातेज' माहितीपूर्ण आणि मनोरंजक मजकुराचा उत्तम मेळ घालत असल्याचे त्यांनी अधोरेखित केले. धावपळीच्या आणि तणावाच्या युगात वाचकांना मानसिक शांतता आणि सकारात्मक ऊर्जा देणारे आध्यात्मिक विचार पोहोचवण्यात हे वृत्तपत्र यशस्वी ठरत आहे, याबद्दल त्यांनी विशेष कौतुक केले.

देऊळबंद २ चित्रपट व स्वामी समर्थांच्या महिमेचे धारावाही आणि हृदयस्पर्शी वृत्तांकनाचेही श्री. तरडे यांनी मनस्वी कौतुक केले.



# विधान परिषद निवडणुकीसाठी प्रशासन सज्ज

## निरीक्षक अशोक काकडे यांच्याकडून तयारीचा सखोल आढावा



अमळनेर : विधान परिषद निवडणुकीच्या पूर्वतयारीचा आढावा घेताना निरीक्षक अशोक काकडे. शेजारी जळगाव उपविभागीय अधिकारी विनयकुमार गोसावी, अमळनेर उपविभागीय अधिकारी मयूर भंगाळे, उपविभागीय पोलीस अधिकारी विनायक कोते, तहसीलदार रुपेशकुमार सुराणा, चोपडयाचे तहसीलदार भाऊसाहेब थोरात, पालिकेचे मुख्याधिकारी गणेश शिंदे आदी.

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : जळगाव जिल्हा स्थानिक प्राधिकारी मतदारसंघाच्या विधान परिषद द्विवार्षिक निवडणूक २०२६ च्या पार्श्वभूमीवर निवडणूक प्रक्रिया पारदर्शक, निष्पक्ष व सुरळीत पार पाडण्यासाठी प्रशासनाने जोरदार तयारी सुरू केली आहे. या अनुषंगाने गुरुवारी दि. ११ ला निवडणूक निरीक्षक अशोक काकडे (भा.प्र.से.) यांनी अमळनेर तहसील कार्यालयाला भेट देऊन मतदान केंद्रासह विविध निवडणूक व्यवस्थेचा सखोल आढावा घेतला.

१८ जून रोजी होणाऱ्या मतदानासाठी तहसीलदारांचे दालन हे मतदान केंद्र म्हणून निश्चित करण्यात आले असून, या ठिकाणी अमळनेर व चोपडा तालुक्यातील एकूण ७६ मतदार मतदानाचा हक्क बजावणार आहेत. मतदान सकाळी ८ ते सायंकाळी ४ वाजेदरम्यान पार पडणार आहे.

निरीक्षक अशोक काकडे यांनी मतदान केंद्राची प्रत्यक्ष पाहणी करून तेथील मूलभूत सुविधांची तपासणी केली. मतदान केंद्रावर अखंडित वीजपुरवठा, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, स्वच्छतागृह, दिव्यांग मतदारांसाठी रॅम्प, इंटरनेट व दळणवळण सुविधा तसेच वीज खंडित झाल्यास पर्यायी विद्युत व्यवस्था उपलब्ध ठेवण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. मतदानाच्या दिवशी कोणतीही अडचण निर्माण होऊ नये यासाठी सर्व यंत्रणांनी समन्वयाने काम करण्याचे निर्देशही त्यांनी दिले.

तसेच मतदानाच्या दिवशी कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी पोलीस व महसूल प्रशासनाने आवश्यक उपाययोजना करण्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. निवडणूक आयोगाच्या सर्व सूचनांची काटेकोर अंमलबजावणी करण्याबरोबरच प्रत्येक अधिकाऱ्याने आपली जबाबदारी अत्यंत दक्षतेने पार पाडावी, असे निर्देश निरीक्षकांनी दिले.यावेळी उपविभागीय अधिकारी जळगाव विनय कुमार गोसावी,उपविभागीय अधिकारी मयूर भंगाळे, उपविभागीय पोलीस अधिकारी विनायक कोते, तहसीलदार रुपेशकुमार सुराणा, चोपडा तहसीलदार भाऊसाहेब थोरात, पालिकेचे मुख्याधिकारी गणेश शिंदे, पोलीस निरीक्षक दत्तात्रय निकम, उपविभागीय कृषी अधिकारी, तालुका कृषी अधिकारी (अमळनेर व चोपडा), राज्य उत्पादन शुल्क विभागाचे अधिकारी, भरारी पथकांचे अधिकारी व कर्मचारी तसेच निवडणूक प्रक्रियेशी संबंधित विविध विभागांचे कर्मचारी उपस्थित होते.

निवडणूक प्रक्रियेत कोणतीही त्रुटी राहू नये, मतदान शांततापूर्ण वातावरणात पार पडावे आणि निवडणूक आयोगाच्या निर्देशांचे शंभर टक्के पालन व्हावे, यासाठी सर्व यंत्रणा सज्ज असल्याचे यावेळी प्रशासनाकडून सांगण्यात आले.



अमळनेर : साने गुरुजींच्या स्मृतिदिनी साने गुरुजी कर्मभूमी स्मारक प्रतिष्ठानाच्या पुढाकारातून साने गुरुजी स्मारक रस्त्याची लोकसहभागातून डागडुजी करतांना नागरीक.

# साने गुरुजी स्मृतिदिनी श्रमदानातून रस्त्याची डागडुजी

## लोकसहभागाचा आदर्श उपक्रम

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : साने गुरुजी यांच्या स्मृतिदिनानिमित्त साने गुरुजी कर्मभूमी स्मारक प्रतिष्ठानच्या पुढाकाराने गुरुवारी (दि. ११) लोकसहभागातून साने गुरुजी स्मारक परिसरातील रस्त्याची डागडुजी करण्यात आली. खराब झालेल्या रस्त्याची समस्या प्रशासनाच्या निदर्शनास आणून देऊनही अपेक्षित कार्यवाही न झाल्याने नागरिकांनी पुढाकार घेत श्रमदानातून हा उपक्रम राबविला.

साने गुरुजी कर्मभूमी स्मारकाकडे जाणारा रस्ता अनेक दिवसांपासून खराब अवस्थेत होता. रस्त्यावरील खड्डे, चिखल व असमतोल मार्गामुळे परिसरातील शेतकरी, कामगार, विद्यार्थी आणि नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता. शासन व लोकप्रतिनिधींकडे वारंवार मागणी करूनही केवळ आश्वासन मिळाल्याने लोकसहभागातून हा प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न करण्यात आला.

या उपक्रमात रस्त्यावरील खड्डे बुजविणे, मुरूम टाकणे तसेच रस्ता समतल करण्याचे काम करण्यात आले. विविध क्षेत्रातील नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग घेत साने गुरुजींच्या समाजसेवा आणि मानवतेच्या विचारांना कृतीतून आदरांजली वाहिली. या श्रमदान उपक्रमासाठी स्वादिष्ट उद्योग समूहाचे निलेश पाटील, अमेय मुंदडा, डॉ. विकास हरताळकर, नगरसेवक अनिल महाजन, चेतन सोनार, माजी नगरसेवक श्याम पाटील यांच्यासह अनेक नागरिकांनी सहकार्य केले. लोकसहभागाच्या माध्यमातून रस्त्याची समस्या मार्गी लावण्याचा हा प्रयत्न परिसरात कौतुकाचा विषय ठरला.

**गर्व से कहो स्वदेशी है हम...!**
**स्वदेशी ही खरिदेंगे हम...!!**

स्वातंत्र्यपूर्व संग्रामातील स्वदे शीची हाक आता पुन्हा देवू या. नवरात्रोत्सवात आपण आदिमाया आदिशक्तीचा जागर करतो त्याप्रमाणेच स्वदेशीचाही जागर करूया..! सच्च्या भारतीयांवर जेव्हा-जेव्हा परकीय आक्रमण होते तेंव्हा-तेंव्हा ते प्रचंड त्वेषाने पेटून उठतात...!! आता तीच वेळ येऊन ठेपली आहे...!!!
जय भारत...!
जय स्वदेशी...!!

## संपादकीय

# परदेशातील पर्यटन

परदेशात जाणाऱ्या भारतीय पर्यटकांची संख्या झपाट्याने वाढत असली, तरी तिथल्या विमानतळांवर, हॉटेल्समध्ये आणि सार्वजनिक ठिकाणी काही पर्यटकांच्या बेशिस्त वागण्यामुळे आंतरराष्ट्रीय स्तरावर भारताची प्रतिमा डागाळत आहे का, असा प्रश्न उपस्थित होत आहे.आपण विश्वगुरू आहोत, याबद्दल अनेकांच्या मनात कोणतीही शंका नाही. त्याशिवाय जीडीपी (सकल राष्ट्रीय उत्पादन) नुसार आपण जगातली सहाव्या क्रयशक्ती समानतेनुसार जगातली तिसऱ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था आहोतच. साहजिकच महासत्ता बनण्यापासून फार दूर नाही... 'ऑपरेशन सिंदूर'सारख्या मोहिमांतून आपण कोणत्याही शत्रुदेशाला कशी सहज धूळ चारतो हे सगळ्या जगाने नुकतेच आ वासून बघितले आहे. शिवाय देशातल्या अर्बन- रुरल नक्षल्यांचा, फालतू डाव्यांचा, बिनडोक समाजवाद्यांचा आणि मूर्ख काँग्रेसवाल्यांचा जवळपास नायनाट करण्यात आला आहे. जगभर जाल तिकडे भारतीयच भारतीय दिसताहेत.अनेक देशांमध्ये त्यांनी राजकीय सत्तापदे मिळवली आहेत. मोठमोठ्या अमेरिकी कंपन्यांची प्रमुखपदे हस्तगत करून त्यांनी भारतीय संस्कृतीचा डंका पिटला आहे. अखंड हिंदुस्थानचे स्वप्न 'वसुधैव कुटुम्बकम'मध्ये परावर्तित झाले आहे. आता हे विश्वचि माझे घर... अशा वेळी आपले परके असे काही उरतच नाही. 'हे विश्वाचे अंगण आम्हां दिले आहे आंदण' या भावनेने आपली म्हणजे भारतीय माणसे जगभर वावरताना दिसतात.एके काळी साप, गारुडी, वाघ, हत्ती रस्त्यावर फिरतात, अशा देशातले लोक या नजरेने ज्यांच्याकडे बघितले गेले होते, त्या देशातले लोक इतक्या आत्मविश्वासाने दुनिया फिरतात, हे ज्यांना बघवत नाही, भारताच्या या सगळ्या प्रगतीबद्दल ज्यांना असूया वाटते, असे लोकच या विश्वगुरू असलेल्या देशातल्या लोकांच्या सगळ्याच गोष्टींवर सतत टीका करत राहतात...

या नतद्रष्ट लोकांनी गेल्या काही वर्षांत भारतीय पर्यटकांच्या वागण्याला नावे ठेवणे सुरू केले आहे...आता आपल्याला हवे तिथे जाऊन, हवे तसे मनमौजी वागून, सुट्टी मस्त घालवून निघण्याच्या आनंदात काही भारतीयांनी घेतला एखाद्या विमानतळाच्या धावपट्टीवर मनमुरादपणे त्यांच्या पारंपरिक नृत्याचा आनंद तर कुठे आणि काय बिघडले? कुणा नतद्रष्टाने त्याचे चित्रीकरण करून समाजमाध्यमांवर नेताच, 'यांनी तर धावपट्टीजवळच गरबा खेळून कशी देशाची लाज घालवली,' वगैरे चोची मारणारेही लगेच पुढे आले. पण व्हिएतनामसारख्या देशात जाऊन विमानतळावरच नाही, तर त्याच्या धावपट्टीजवळ असेल, पण आपल्या नृत्यसंस्कृतीचे दर्शन घडवणे म्हणजे लाज घालवणे कसे बरे ? तिथल्या धावपट्टीवरच्या कर्मचारी वर्गाला तरी यामुळे कळले असेलच ना भारतीय संस्कृती किती महान आहे आणि भारतीय लोक किती आनंदी आहेत ते. शिवाय धावपट्टीजवळ त्यांची रोजची काहीही कामे चालोत.आम्ही थोडेच रोज तिथे जातो? यांचे त्यांचे नियम आम्ही पाळत बसलो, यांचा-त्यांचा विचार करत बसलो, तर आम्ही आमच्या सुट्टीचा आनंद कधी घेणार? तो तर प्रत्येक ठिकाणाहून शक्य तितका घ्यायला हवा. परदेशात फिरायला जाताना आम्हाला समजते की आंतरराष्ट्रीय विमानसेवेत विनामूल्य मद्य मिळते. मग ते पुन्हा पुन्हा मागून हवे तेवढे घेतले तर काय बिघडले? पण लागले लगेच इतरांच्या पोटात दुखायला. हवाई सुंदऱ्या या प्रवाशांच्या सेवेसाठी नेमलेल्या अधिकृत कर्मचारी. त्यांना चारदोन वेळा बेल वाजवून पुन्हा पुन्हा बोलावून घेतले तर त्यात काय चुकले? झाला लगेच 'भारतीय लोक कसे चुकीचे वागतात'चा गजर सुरू. अलीकडेच शिकागोहून निघालेले एअर इंडियाचे एक विमान अर्ध्या वाटेतून परत फिरले म्हणे. कारण काय तर त्या विमानात खूप मोठ्या प्रमाणात भारतीय प्रवासी होते आणि त्यांनी विमानाच्या शौचालयात फ्लश करताना कपडे, प्लास्टिक पिशव्या, डायपर टाकल्यामुळे विमानातील १२ पैकी आठ शौचालये बंद पडली. या कारणासाठी विमान परत फिरवले असे म्हणणे जरा अतिच. बरेच भारतीय प्रवासी होते, म्हणजे त्यांनीच केले असे थोडेच आहे? भारतीय प्रवाशांना बदनाम करायचा हा कटच असणार; दुसरे काही नाही!भारतीय लोक आजकाल मोठ्या संख्येने देशाबाहेर फिरायला बाहेर पडू लागले आहेत. ते उत्साहाने पर्यटनाचा आनंद घेत फिरतात आणि त्यांचा हा आनंद न बघवणारे सगळे जग भारतीय लोक कसे मोठमोठ्याने बोलतात, सगळीकडचे नियम मोडतात, गोंधळ घालतात असे म्हणत बोटे मोडते. स्वित्झर्लंडमधील एका महागड्या हॉटेलात म्हणे 'भारतीय पर्यटक पाहुण्यांसाठी' असे शीर्षक असलेल्या एका फलकावर 'बाल्कनीत, पॅसेजमध्ये हळू बोला, शांतता पाळा, न्याहारीच्या बुफेमधील पदार्थ हॉटेलच्या रूममध्ये नेऊ नका, तसे केल्यास स्वतंत्र आकार पडेल' असे लिहिले होते.म्हणजे पुन्हा तेच. 'वसुधैव कुटुम्बकम' हा संदेश जगाला देणाऱ्या भारतीयांनी काय आपल्याच कुटुंबातही मनासारखे वागायचे नाही? आम्ही काय यांचे नियम पाळायला तिथे जातो की काय? ज्यांना शांतता हवी असते, त्यांना मजा करायची नसते, ज्यांना आमचे बोलणे बडबड वाटते, त्यांनाच त्यांच्या घरीच बसायला सांगा ना मग... काही महिन्यांपूर्वी बालीमधल्या एका हॉटेलमध्ये म्हणे एका भारतीय पर्यटक कुटुंबाच्या सामानातून हॉटेल कर्मचाऱ्यांनी आरसे, शोभेच्या वस्तू, हँगर्स अशा वस्तू काढून घेत त्यांच्यावर चोरीचा आरोप केला होता. शिवाय त्या पट्टायाच्या समुद्रकिनारी नैसर्गिक विधींसाठी केवढे पैसे मोजावे लागतात.

'होल वावर इज अवर' असताना त्यासाठी पैसे कशाला द्यायचे? आणि थायलंडचे काय सांगता? पर्यटकांच्या म्हणजे आमच्या पैशांवर चालणारा हा देश.आता म्हणे पर्यटकांच्या गैरवर्तनाला आळा घालण्यासाठी त्याने ९३ देशांमधील पर्यटकांवर बंधने घातली आहेत. पण त्यात महान भारताचाही समावेश करायचा? पुण्याहून मुंबईला जावे तसे आपले लोक बँकॉक, पट्टायाला जात असताना आपल्यासाठीची ६० दिवसांची व्हिसामुक्त सवलत नेमकी मे महिन्याआधीच थायलंडने रद्द करून १५ दिवसांवर आणायची? शिवाय आता यापुढच्या काळात थायलंडला जायचे तर ई व्हिसा घेऊन त्यासाठी एका वेळचे अडीच हजार रुपये भरायचे? असे असेल तर थायलंडला काय सोने लागले आहे की काय? इतर ठिकाणी जाऊ. तर हे सारे असे आहे. आपण वेगाने प्रगती केली आहे. आपला खूप विकास झाला आहे. त्यामुळेच २०१४ च्या आधीच्या काळाच्या तुलनेत आता भारतीय लोकांकडे खूप पैसा आला आहे. ते खूप मोठ्या संख्येने परदेशी फिरू लागले आहेत. जगात वावरण्याचा आधी कधीच नव्हता इतका आत्मविश्वास त्यांच्याठायी निर्माण झाला आहे. त्याचे दर्शन ते जिथे जातात, तिथे त्यांच्यावागण्यातून होत राहते. अनोळखी ठिकाणी जाऊन आपल्याला हवे तसे वागणे हे सोपे नाहीच मुळी. भारतीयांचा हा आत्मविश्वास जगाला झेपत नाही... म्हणून तर भारतीय पर्यटकांच्या बेशिस्तीबद्दल वटवट वाढते... याला अपवाद असतीलच, त्यांना वाटेल हे सारे अनाठायी... पण परदेशांतले 'आत्म'दर्शन तेवढ्याने थोडेच थांबेल !

# शिक्षकांकडूनच पाठ्यपुस्तकांची वाहतूक

## अमळनेर शिक्षण विभागाच्या नियोजनशून्य कारभारावर व्यक्त होतोय संताप

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : नवीन शैक्षणिक वर्षाच्या तोंडावर अमळनेर तालुक्यातील प्राथमिक व माध्यमिक शिक्षकांना शासनाच्या नियमांविरोधात जाऊन भर उन्हात पाठ्यपुस्तकांची वाहतूक करावी लागत असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. प्रभारी गट शिक्षणाधिकाऱ्यांच्या मनमानी आणि नियोजनशून्य कारभारामुळे शिक्षकांमध्ये तीव्र नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे.

शासन निर्णयानुसार विद्यार्थ्यांसाठीची पाठ्यपुस्तके शाळांपर्यंत पोहोचविण्याची जबाबदारी प्रशासनाची असताना, ही जबाबदारी केंद्रप्रमुख आणि मुख्याध्यापकांवर ढकलण्यात आल्याचा आरोप होत आहे. मंगरूळ येथील शाळेत साठवून ठेवलेली पुस्तके संबंधित शाळांपर्यंत नेण्यासाठी मुख्याध्यापकांना तोंडी आदेश देण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. विशेष म्हणजे, पाठ्यपुस्तकांच्या वाहतुकीसाठी कोणतीही आगाऊ रक्कम किंवा स्वतंत्र व्यवस्था करण्यात आलेली नसल्याने शिक्षकांना स्वतःच्या खिशातून पाचशे ते हजार रुपये



खर्च करून खाजगी वाहनांची व्यवस्था करावी लागत आहे. काही ठिकाणी शिक्षकांना पुस्तकांचे गठ्ठे स्वतः उचलून वाहून न्यावे लागत असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. त्यामुळे शिक्षकांमध्ये तीव्र असंतोष पसरला आहे. समग्र शिक्षा अभियान आणि पीएमश्री योजनेंतर्गत इयत्ता पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तके वितरित करण्यात येतात. शाळा सुरू होण्यापूर्वीच अमळनेर शिक्षण विभागाकडे पाठ्यपुस्तकांचा साठा उपलब्ध झाला असून १५ जूनपूर्वी ती शाळांपर्यंत पोहोचविण्यासाठी प्रशासनाची धडपड सुरू आहे. मात्र, या कामासाठी स्वतंत्र वाहतूकदार नियुक्त न करता शिक्षकांनाच वाहतुकीची जबाबदारी देण्यात आल्याने प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. याबाबत विचारणा केली असता प्रभारी गट शिक्षणाधिकारी म्हणाले, ती जबाबदारी केंद्रप्रमुखांची आहे. त्याबाबत मी लेखी आदेश दिले आहेत.

दरम्यान, या प्रकरणाची गंभीर दखल घेत जिल्हा प्राथमिक शिक्षण अधिकारी निलेश पाटील यांनी, "या प्रकरणाची तात्काळ चौकशी करून संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक सूचना दिल्या जातील, असे सांगितले.शिक्षणाचा दर्जा उंचावण्याची जबाबदारी सांभाळणाऱ्या शिक्षकांनाच पाठ्यपुस्तकांच्या वाहतुकीसाठी हमालाची भूमिका बजावावी लागत असल्याने शिक्षण विभागाच्या नियोजनावर प्रश्नचिन्ह उपस्थित होत असून, संबंधित प्रकरणाची सखोल चौकशी करून जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी शिक्षक वर्गातून होत आहे.

# अमळनेर पालिकेने खरेदी केलेल्या ५० कचरा हातगाड्या निकृष्ट दर्जाच्या

## चौकशी करून कंत्राटदारावर कारवाईची 'सफाई मजदूर काँग्रेस'ची मागणी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : अमळनेर नगर परिषदेच्या आरोग्य विभागातील सफाई कामगारांसाठी नुकत्याच खरेदी करण्यात आलेल्या पत्र्याच्या हातगाड्या अत्यंत निकृष्ट आणि दर्जाहीन असल्याचा खळबळजनक प्रकार समोर आला आहे. या संपूर्ण प्रकरणाची तात्काळ तांत्रिक चौकशी करून दोषी कंत्राटदाराविरुद्ध कठोर कारवाई करण्यात यावी आणि त्याचे थकीत बिल तात्काळ थांबवावे, अशी मागणी अखिल भारतीय सफाई मजदूर काँग्रेस संघटनेने केली आहे. या संदर्भात संघटनेचे महाराष्ट्र प्रदेश सचिव रघुनाथ मोरे यांनी नगरपरिषद प्रशासनाला तक्रार अर्ज सादर केला आहे.

अमळनेर शहरातील केर-कचरा संकलन व वाहतुकीसाठी आरोग्य विभागाच्या सफाई कामगारांना नुकत्याच सुमारे ५० पत्र्याच्या हातगाड्या वितरित करण्यात आल्या आहेत. तसेच लवकरच आणखी हातगाड्या दिल्या जाणार असल्याचे समजते. मात्र, वितरित करण्यात आलेल्या या हातगाड्यांची प्रत्यक्ष पाहणी केली असता, त्या अत्यंत हलक्या दर्जाचे लोखंडी पत्रे वापरून तयार केल्याचे निदर्शनास आले आहे. या गाड्या वापरायला सुरुवात होऊन अवघे २ ते ४ दिवसही झाले नसताना त्यांचे पत्रे उखडून निघत आहेत. किरकोळ कचऱ्याच्या वजनामुळेही पत्रे दबले जात असल्याने या गाड्या सफाई कामगारांना वापरण्यायोग्य राहिलेल्या नाहीत. परिणामी काम करताना कर्मचाऱ्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.

या निकृष्ट दर्जाच्या हातगाड्यांची खरेदी करताना गुणवत्ता तपासणी योग्य रीतीने झाली आहे की नाही, याबाबत मोठी शंका निर्माण झाली आहे. हा थेट सार्वजनिक निधीचा अपव्यय असून कंत्राटदाराने करारातील अटी व नियमांचे उघड उल्लंघन केल्याचे प्रथमदर्शनी दिसून येत आहे.

**नगरपालिकेकडे करण्यात आलेल्या प्रमुख मागण्या :** अखिल भारतीय सफाई मजदूर काँग्रेस संघटनेचे प्रदेश सचिव रघुनाथ मोरे यांनी नगराध्यक्ष आणि मुख्याधिकारी यांना दिलेल्या निवेदनात खालील मागण्या केल्या आहेत.या पत्री हातगाड्यांच्या गुणवत्तेची तात्काळ तांत्रिक चौकशी करण्यात यावी.

हातगाड्यांचे नमुने तपासून ते मूळ करारातील निकषांनुसार आहेत की नाही, याची खातरजमा करावी. चौकशी पूर्ण होईपर्यंत संबंधित कंत्राटदाराचे कोणतेही बिल मंजूर किंवा अदा करण्यात येऊ नये.गाड्या निकृष्ट दर्जाच्या असल्याचे सिद्ध झाल्यास कंत्राटदाराला तातडीने काळ्या यादीत टाकून कायदेशीर कारवाई करावी.संबंधित कंत्राटदारासोबत झालेला पुरवठा करार/कंत्राट तात्काळ रद्द करण्यात यावे. नगर परिषदेचे आर्थिक नुकसान टाळण्यासाठी या निकृष्ट हातगाड्या परत घेऊन, त्याऐवजी कंत्राटदाराला स्वखर्चाने नवीन दर्जेदार हातगाड्या पुरवण्यास भाग पाडावे.

या संपूर्ण प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून तात्काळ योग्य ती कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी निवेदनात शेवटी करण्यात आली आहे. या निवेदनाच्या प्रती माहितीसाठी नगर परिषदेच्या लेखापाल आणि लेखा विभागालाही सादर करण्यात आल्या आहेत. आता यावर अमळनेर नगरपरिषद प्रशासन काय पावले उचलते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# मुख्यालयी राहण्याची सक्ती बेकायदेशीर

## आमदार बंब यांची मागणी न्यायालयाच्या निर्णयाविरोधात : रावसाहेब पाटील

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : महाराष्ट्र शासनाने २५ एप्रिल १९८८ रोजी केलेला शासकीय ठराव आणि ५ फेब्रुवारी १९९० च्या शासकीय ठरावाच्या कलम ४ नुसार ग्रामीण भागातील कर्मचाऱ्यांनी कर्तव्यस्थानी अथवा मुख्यालयी राहण्याची अट काढून टाकली असून त्यानंतर कोणताही शासकीय ठराव झालेला नसताना आमदार प्रशांत बंब कर्मचार्यांना मुख्यालयी राहण्याचा आग्रह करतात हे चुकीचे आहे. त्याचप्रमाणे मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने याचिका क्रमांक ५८२२/२०१४ मध्ये सुद्धा कर्मचाऱ्यांच्या बाजूने निकाल दिलेला असल्याने आमदार बंब यांची मागणी उच्च न्यायालयाचा अवमान करणारी ठरेल असे मत महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघाचे जिल्हाध्यक्ष रावसाहेब मांगो पाटील यांनी व्यक्त केले आहे.

आमदार प्रशांत बंब जिल्हा परिषदेच्या शिक्षकांना मुख्यालयी राहण्याची सक्ती करून त्यांना वेठीस धरण्याचा प्रकार करीत आहेत. २०१४ मध्ये जळगाव जिल्हा परिषदेच्या तत्कालीन अधिकाऱ्यांनी २००८ च्या एका विभागाच्या परिपत्रकाचा आधार घेत मुख्यालयी न राहणाऱ्या शिक्षक आणि कर्मचाऱ्यांचा घरभाडे भत्ता रद्द करण्याचा निर्णय घेतला होता. त्यावेळी प्राथमिक शिक्षक संघाचे अध्यक्ष रावसाहेब मांगो पाटील यांनी औरंगाबाद खंडपीठात ५८२२/२०१४ याचिका दाखल केली होती. त्यावेळी न्यायालयाने १९८८ व १९९० च्या शासकीय ठरावाचा संदर्भ देत एखादे परिपत्रक शासनाच्या वित्त विभागाच्या निर्णयावर अथवा ठरावातील तरतुदींना रद्द करू शकत नाहीत त्यामुळे तो शासकीय ठराव अजूनही अबाधित आहे आणि कोणत्याही त्यांनंतरच्या शासकीय ठरावद्वारे तो रद्द करण्यात आलेला नाही. म्हणून कर्मचाऱ्यांची मुख्यालयी राहण्याची अट रद्द करून त्यांना घरभाडे पूर्ववत सुरू करण्याचा निर्णय न्या एस एस शिंदे व न्या ए एम बदर यांनी १९ ऑक्टोबर २०१५ मध्ये दिला होता.त्याच निर्णयाचा व आधीच्या शासन निर्णयाचा संदर्भ देत महाराष्ट्र शासनाच्या वित्त विभागाने ७ ऑक्टोबर २०१६ रोजी शासन निर्णय क्रमांक १०१५/प्र क्र / सेवा ५ नुसार मुख्यालयी राहण्याची अट काढून टाकण्यात आली आहे.त्यांनतर शासनाने शासकीय निमशासकीय कर्मचारी मुख्यालयी राहण्याचा कोणताही ठराव केलेला नसल्याने तसेच शासनाने महाराष्ट्र जिल्हा परिषदेच्या कर्मचाऱ्यांना ग्रामीण भागात निवासस्थाने उपलब्ध करून दिले नसल्याने आमदार प्रशांत बंब यांची कर्मचाऱ्यांनी मुख्यालयी राहण्याची मागणी निरर्थक आणि न्यायालयाचा अवमान करणारी ठरते. असेही रावसाहेब पाटील यांनी म्हटले आहे.

# 'स्मार्ट कार्ड' च्या नावाखाली एजंटकडून प्रवाशांची लूट

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : अमळनेरमध्ये एसटी महामंडळाच्या नॅशनल कॉमन मोबिलिटी कार्ड (स्मार्ट कार्ड) वितरणात एजंटांकडून प्रवाशांची मोठ्या प्रमाणावर आर्थिक लूट होत असल्याचे समोर आले आहे. एसटी महामंडळाने स्मार्ट कार्डसाठी १९९ रुपये हा अधिकृत दर निश्चित केला आहे. मात्र, एजंट प्रवाशांकडून २५० ते ३०० रुपये वसूल करत आहेत. जादा पैसे का घेतले जातात, असे विचारल्यावर कुरिअर खर्च किंवा मनुष्यबळ खर्च अशी सबब दिली जात आहे.कार्ड मिळाल्यावर ते सुरू करण्यासाठी एजंट प्रवाशांकडून २०० रुपये वेगळे उकळत आहेत.१९९ रुपयांचे कार्ड मिळवण्यासाठी प्रवाशांना प्रत्यक्षात ४०० ते ४५० रुपये मोजावे लागत आहेत.या गैरप्रकाराचा सर्वाधिक फटका ग्रामीण भागातील अशिक्षित प्रवाशांना, वृद्ध व्यक्तींना आणि महिलांना बसत आहे, ज्यांना या तांत्रिक प्रक्रियेची फारशी माहिती नाही.एसटी महामंडळाने स्वतःच्या कार्यालयांच्या आवारातच स्मार्ट कार्डसाठी जास्तीत जास्त काउंटर सुरू करावेत. एजंटांकडून होणारी ही लूट थांबवण्यासाठी वरिष्ठ अधिकाऱ्यांनी तातडीने लक्ष देऊन कारवाई करावी.

# अमळनेर बसस्थानकातील सोनसाखळी चोरी उघड

## दोन महिला अवघ्या दोन तासांत अटक

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : अमळनेर एस.टी. बसमध्ये चढताना महिलेची सोन्याची पोत चोरणाऱ्या दोघा महिलांना अवघ्या दोन तासात पोलिसांनी मालेगाव येथून अटक केली आहे.

कल्पनाबाई अशोक शिंपी (वय ६५ रा. शिरूड) ही महिला ९ रोजी सकाळी ११ वाजेच्या सुमारास अमळनेर बसस्थानकावरून शिरूड जाण्यासाठी मुकटी बसमध्ये चढत होती. बसमध्ये चढताना गर्दी असल्याने ओढाताण होत होती. कसेतरी महिला बसमध्ये चढली आणि तिला तिच्या गळ्यातील १५ हजार रुपये किमतीची ३ ग्राम वजनाची सोन्याची पोत गायब झाल्याचे समजले. महिलेने बसमध्ये आणि खाली उतरून शोधाशोध करण्याचा प्रयत्न केला. पोत मिळून आली नाही म्हणून महिलेने पोलिसात तक्रार केली. फिर्याद दाखल होत नाही त्याच्या आधीच पोलीस निरीक्षक दत्तात्रय निकम यांनी तातडीने दखल घेत पोलीस उपनिरीक्षक शरद काकळीज, प्रशांत पाटील, सूर्यकांत साळुंखे, उज्वलकुमार म्हस्के, नितीन कापडणे, उज्वल पाटील, नितीन मनोरे या पथकाला चोरट्यांचा शोध घ्यायला पाठवले. पोलिसांनी बसस्थानक आणि बाहेरील सीसीटीव्ही फुटेज तपासले असता त्यांना दोन संशयित महिला बसजवळ आणि बाहेर रिक्षमध्ये बसतांना आढळून आल्या. पोलिसांनी तातडीने रिक्षाचा पाठलाग केला. मालेगावजवळ चाळीसगाव चौफुलीवर रिक्षा दिसताच घेराव घातला. या रिक्षाला महिलांसह पकडण्यात आले. शारदा सुनील कसबे (वय ३५) व माया श्रावण कांबळे (वय ५५ रा. एकविरा माता मंदिराजवळ, धुळे. हल्ली मुक्काम पवन नगर चाळीसगावरोड, धुळे) असे त्या महिलांचे नाव आहे.

या महिलांनी चोरी करण्यासाठी भाड्याने रिक्षा केली होती, अशी माहिती पोलिसांना मिळाली.चोरीनंतर अवघ्या दोन तासात पोलिसांनी आरोपी पकडून आणल्याने पोलिसांचे कौतुक होत आहे.पोलिसांच्या या तत्परतेचे कौतुक नागरिकांकडून होत असून असेच सातत्य प्रत्येक चोरींमध्ये, घरफोडींमध्ये होणे अपेक्षीत आहे.

# बडिशेपचे आरोग्यदायी फायदे

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

**१) उत्तम औषध :** रुचकर, पाचक, कितीही जडान्न खाऊन वर बडिशेप खावी, ते अन्न पचते (जेवणानंतरच खावी). तोंडाला स्वाद येतो. जिभेचा चिकटा दूर होतो. आतड्यांची हानी टळते.

**२) पोटात गॅस :** पोटात गॅस होऊ देत नाही व चिकटपणा, आमांश दूर करते.

**३) अपचनाच्या तक्रारी :** बडिशेप, काढा वा अर्क वापरता येतो. उदा. कॉलरा, जुलाब, हगवण, आमांश, अजीर्ण, पोटदुखी, पोट फुगणे, वारंवार संडासची भावना होणे, पोटात खुटखुटणे इ. थोडक्यात, सर्व पचनसंस्थेसाठी उपयोगी. जेवणानंतर एक चमचा बडिशेप रोज दोन वेळा खावी.

**४) मुलांना दात येताना :** जुलाबाचा त्रास होतो, त्यासाठी चुन्याच्या निवळीसह बडीशेप चूर्ण घ्यावे.

**५) भूक लागत नसेल :** रोज बडिशेप खावी. त्यासाठी शक्य असेल तर एक चमचा बडिशेप चूर्णात दोन चमचे मध टाकून त्याचे चाटण रोज एक वेळा घ्यावे.

**६) स्मरणशक्ती :** स्मरणशक्ती सुधारण्यासाठी व बुद्धी तरतरीत ठेवण्यासाठी बडिशेप चूर्ण + तूप, चाटण द्यावे.

**७) तापामध्ये अंगाची आग होणे :** जिभेला शोष पडत असेल तर बडिशेपेचा काढा खडीसाखर घालून प्यायला द्यावा.

**८) मासिक पाळी :** पोटात दुखत असेल, तर त्यासाठी एक चमचा बडिशेप रोज तीन वेळा चावून खावी.

**९) लघवी कमी होणे :** लघवी कमी होत असेल, तसेच लघवीला जळजळ किंवा आग होत असेल तर एक चमचा बडिशेपेचा काढा करून प्यावा.

**१०) उलट्या होणे :** अर्धा चमचा बडिशेप चूर्ण, एक चमचा मोरावळ्यांत टाकून चाटण करणे.

**११) कोरडा खोकला :** एक चमचा बडिशेप चूर्ण + एक चमचा पत्री खडीसाखर बरोबर घेणे.

**१२) सूज व वेदना :** बडिशेप, सैंधव पूड, ओवा समभाग घेऊन तव्यावर गरम करून त्यांची रुमालात पुरचुंडी करून शेकावे.

**१३) सरबत :** बडिशेप ४ वा ५ चमचे घेऊन ती एका भांड्यात पाणी भरून त्यात टाकून रात्रभर भिजत ठेवावी. सकाळी हे मिश्रण १० मिनिटे उकळावे व गाळून त्यात ४ वा ५ चमचे खडीसाखरेचा पाक करून घालावा. म्हणजे चांगले सरबत तयार होते. या सरबतामुळे भूक वाढते, पचनशक्ती सुधारते, उष्णता कमी होते, शिवाय ते पौष्टिक आहे.



**१४) विरेचन चूर्ण :** बडिशेप, ज्येष्ठमध, सोनामुखी प्रत्येकी १५० ग्रॅम एकत्र करून त्यांची पूड करावी. त्यात ३०० ग्रॅम खडीसाखर पूड करून मिसळावी, म्हणजे हे विरेचन चूर्ण तयार होते. रात्री झोपण्यापूर्वी एक चमचा चूर्ण गरम पाण्या सोबत घ्यावे. त्याने पोट साफ होते. तसेच मूळव्याध, तोंड येणे इ. उष्णताविकार व त्वचाविकार बरे होतात.

**१५) एनर्जी ड्रिंक :** बडिशेप एक चमचा, एका वेलची दाणे, दोन खजुराच्या आठळ्या (बिया काढाव्यात). हे सर्व मिसळून दोन कप पाण्यात रात्री भिजत घालावे. सकाळी मिक्सर मधून काढावे म्हणजे बलदायी पेय तयार होते, ते रोज सकाळी ताकदीसाठी प्यावे.

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिगांबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :- आनंद डिगंबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7711004040, 7711004242, ई-मेल : globalmahatej@gmail.com



# दररोज लवंगेचे पाणी प्यायल्यास शरीरात नेमके काय घडते?

## फक्त एका महिन्यात दिसू शकतात हे ५ मोठे बदल!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

सकाळी उठल्यावर रिकाम्यापोटी काही लोक गरम पाणी, काही लोक लिंबू-पाणी तर काही जण विविध औषधी पेयांचे सेवन करतात. पण तुम्हाला माहीत आहे का, स्वयंपाकघरात सहज मिळणारी छोटीशी लवंग तुमच्या आरोग्यासाठी मोठा बदल घडवू शकते? अनेक जण रात्री पाण्यात लवंग भिजवून ठेवतात आणि सकाळी ते पाणी पितात.

लवंगेमध्ये अँटीऑक्सिडंट्स, जीवनसत्त्वे व युजेनॉल नावाचे प्रभावी संयुग मोठ्या प्रमाणात आढळते. त्यामुळे शरीराला विविध प्रकारचे आरोग्यदायी फायदे मिळू शकतात. नियमितपणे एक महिन्यापर्यंत लवंगेचे पाणी प्यायल्यास शरीरात काही सकारात्मक बदल दिसू शकतात, असे तज्ज्ञ सांगतात. चला तर जाणून घेऊया. दररोज लवंगेचे पाणी प्यायल्यास शरीरात नेमके कोणते ५ बदल होऊ शकतात.

### १) पचनक्रिया सुधारते, गॅस आणि पोटफुगी कमी होऊ शकते

लवंगेचे पाणी पचनसंस्थेला सौम्यपणे सक्रिय करते. हे पाणी पोटातील एंझाइम्सची निर्मिती वाढवते. ज्यामुळे अन्नाचे विघटन व्यवस्थित होते. त्यामुळे अपचन, गॅस, पोट फुगणे किंवा पोटात जडपणा जाणवण्यासारख्या समस्या कमी होऊ शकतात. लवंगेच्या पाण्याचे नियमित सेवन केल्यास पोटातील आम्लपित्त व बद्धकोष्ठतेची तक्रारही काही प्रमाणात कमी होऊ शकते. एक महिन्याच्या सेवनानंतर पचनसंस्थेची कार्यक्षमता सुधारल्याचा अनुभव अनेकांना येतो.

### २) रोगप्रतिकारक शक्ती मजबूत होण्यास मदत

लवंगेमध्ये असलेले अँटीऑक्सिडंट्स आणि जंतुनाशक गुणधर्म शरीराला संसर्गांपासून संरक्षण देण्यास मदत करतात. दररोज लवंगेचे पाणी घेतल्यास शरीरातील नैसर्गिक संरक्षण प्रणाली अधिक सक्षम बनू शकते. सर्दी-खोकला, फ्लूसारख्या हंगामी आजारांपासून बचाव करण्यासाठीही हे उपयुक्त ठरू शकते. तसेच, लवंगेतील अँटीऑक्सिडंट्स शरीरातील फ्री रॅडिकल्स कमी करण्यास मदत करतात, ज्यामुळे पेशींचे नुकसान कमी होते आणि शरीराची प्रतिकारशक्ती वाढते.



### ३) तोंडाच्या आरोग्यासाठी फायदेशीर

लहानपणी दात दुखत असताना अनेकांनी लवंग किंवा लवंगेचे तेल वापरलेले असते. त्यामागे कारण म्हणजे लवंगेचे प्रतिजैविक गुणधर्म. लवंगेचे पाणी नियमित प्यायल्यास तोंडातील हानिकारक जंतू कमी होण्यास मदत होऊ शकते. त्यामुळे दुर्गंधी, हिरड्यांचे संसर्ग व दातांच्या समस्या कमी होण्याची शक्यता असते. तसेच, हिरड्यांमधील सूज कमी करण्यास आणि तोंड ताजेतवाने ठेवण्यासही लवंगाचे पाणी मदत करू शकते.

### ४) रक्तातील साखरेचे संतुलन राखण्यास मदत

लवंगेमध्ये असलेले काही नैसर्गिक घटक शरीरातील इन्सुलिनच्या कार्यक्षमतेवर सकारात्मक परिणाम करू शकतात. त्यामुळे रक्तातील साखरेची पातळी नियंत्रित ठेवण्यास काही प्रमाणात मदत मिळू शकते. विशेषतः मधुमेहाचा धोका असलेल्या लोकांसाठी लवंगेचे पाणी सहायक ठरू शकते. मात्र, याचा वापर करण्यापूर्वी डॉक्टरांचा सल्ला घेणे आवश्यक आहे.

### ५) शरीरातील सूज आणि सांधेदुखी कमी होण्यास मदत

शरीरातील दीर्घकाळ राहणारी सौम्य सूज ही अनेक समस्यांचे मूळ ठरू शकते. त्यामुळे सांधेदुखी, स्नायूंचा ताण किंवा त्वचेच्या समस्या निर्माण होऊ शकतात. लवंगेतील युजेनॉल संयुगात दाहशामक गुणधर्म आढळतो. त्यामुळे नियमितपणे लवंगेचे पाणी प्यायल्यास शरीरातील सूज कमी होण्यास मदत होऊ शकते. संधिवाताची सौम्य समस्या असणाऱ्यांना किंवा नियमित शारीरिक श्रम करणाऱ्यांना याचा फायदा होऊ शकतो.

तज्ज्ञांच्या मते कोणताही घरगुती उपाय हा एकट्याने चमत्कार घडवत नाही. लवंगेचे पाणी उपयुक्त असले तरी त्यासोबत संतुलित आहार, नियमित व्यायाम व पुरेसे पाणी पिणे या बाबीही तितक्याचच महत्त्वाच्या आहेत. आपल्या शरीराची योग्य काळजी घेतली, चांगल्या सवयी अंगीकारल्या आणि आरोग्यदायी जीवनशैली ठेवली, तरच अशा नैसर्गिक उपायांचा पूर्ण फायदा मिळू शकतो.

# १० : १० वेळेची सुरूवात कुणी केली?

## जगाने तीच पद्धत का स्वीकारली? जुन्या ट्रेंडची ऐतिहासिक कहाणी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

२०१७ मध्ये एक औपचारिक वैज्ञानिक अभ्यास करण्यात आला. 'फ्रंटियर्स इन सायकोलॉजी' या नियतकालिकात संशोधन प्रकाशित करण्यात आले.

**सकारात्मक भावना :** त्यात १० : १० ही वेळ दशविणारी घड्याळे पाहणाऱ्या व्यक्तींनी इतर वेळी सेट केलेली घड्याळे पाहणाऱ्या व्यक्तींच्या तुलनेत अधिक सकारात्मक भावना व्यक्त केल्याचे दिसून आले.

**निर्जीव वस्तू :** या अभ्यासातून असेही समोर आले, की विशेषतः स्त्रियांमध्ये निर्जीव वस्तूंमध्ये मानवी चेहऱ्यावरील भाव ओळखण्याची प्रवृत्ती अधिक तीव्र असते. यामुळेच हे 'हसणारे घड्याळ' स्त्रियांना इतक्या वेगाने आणि खोलवर का आकर्षित करते, याचे स्पष्टीकरण मिळते.



**घड्याळाची वेळ :** तुम्हाला हे जाणून कदाचित आश्चर्य वाटेल, की जाहिरातींमध्ये घड्याळाची वेळ नेहमीच १० : १० अशी दर्शविली जात नव्हती. या प्रथेची सुरूवात होण्यापूर्वी बहुतेक घड्याळ उत्पादक कंपन्या आपल्या जाहिरातींमध्ये घड्याळाची वेळ ८ : २० अशी सेट करत असत.

**चेहरा :** ८ : २० या वेळी घड्याळाचे दोन्ही काटे एकमेकांपासून समान अंतरावर असले, तरी या रचनेमध्ये एक मोठी समस्या होती. या स्थितीत घड्याळाचे काटे खाली झुकलेले दिसत असत. ज्यामुळे तो चेहरा एखाद्या दुःखी चेहऱ्यासारखाकिंवा 'रडल्यासारखा' भासत असे.

**निर्णय :** आपल्या जाहिरातींमधून ही नकारात्मक आणि उदास प्रतिमा काढून टाकण्याच्या उद्देशानेच कंपन्यांनी त्यानंतर घड्याळाची वेळ बदलण्याचा तो महत्त्वपूर्ण निर्णय घेतला.

**हॅमिल्टन वॉच कंपनी :** विपणन क्षेत्रातील या अनोख्या प्रथेची म्हणजेच घड्याळाचे काटे १० : १० यावेळी सेट करण्याच्या पद्धतीची सुरूवात करण्याचे संपूर्ण श्रेय सुप्रसिद्ध 'हॅमिल्टन वॉच कंपनी'ला जाते.

**उत्पादन :** १९२६ मध्ये या कंपनीसाठी काम करणाऱ्या एका जाहिरात संस्थेच्या कलादिग्दर्शकाने या संकल्पनेचा प्रयोग सर्वप्रथम करून पाहिला. त्याच्या असे निदर्शनास आले, की घड्याळाचे काटे ८ : २० ऐवजी १० : १० या स्थितीत ठेवल्यास ते उत्पादन अधिक कलात्मकदृष्ट्या सुंदर आणि व्यावसायिकदृष्ट्या अधिक आकर्षक दिसते.

**स्वीकार :** हॅमिल्टनची ही नावीन्यपूर्ण आणि यशस्वी रणनीती पाहून इतर प्रमुख कंपन्यांनीही हळूहळू आपल्या जुन्या सवयी सोडून दिल्या आणि या नव्या दृष्टिकोनाचा स्वीकार करण्यास सुरूवात केली.

# जुन्नरच्या सिद्धीने गाठले आकाश!

## अवघ्या २०व्या वर्षी अमेरिकेतून कमर्शियल पायलट बनण्याचा मान

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

राजुरी (ता. जुन्नरी) येथील सिद्धी अनंत हाडवळे हिने अवघ्या २०व्या वर्षी अमेरिकेत व्यावसायिक वैमानिक प्रशिक्षण यशस्वीरित्या पूर्ण करून अंतिम पायलट परीक्षा उत्तीर्ण केली आहे. तिच्या या दैदीप्यमान यशामुळे राजुरी गावासह संपूर्ण जुन्नर तालुक्यात अभिमानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

लहानपणापासूनच सिद्धीला काहीतरी वेगळे करण्याची इच्छा होती. तिच्या मनात पायलट होण्याचे स्वप्न होते. सोशल मीडियावरून या क्षेत्राची माहिती मिळाल्यानंतर हे शिक्षण अत्यंत खर्चिक असल्याचे तिच्या लक्षात आले. त्यामुळे आपल्या कुटुंबाच्या आर्थिक परिस्थितीचा विचार करून तिने हे स्वप्न बराच काळ मनातच जपून ठेवले.




बारावीची परीक्षा पूर्ण झाल्यानंतर पुढे कोणत्या क्षेत्रात करिअर करायचे, हा प्रश्न तिच्यासमोर उभा होता. वडिलांची इच्छा होती की तिने डॉक्टर किंवा अभियंता व्हावे. मात्र वडिलांनी पुढील शिक्षणाबाबत विचारणा केली असता, सिद्धीने धाडसाने आपले स्वप्न व्यक्त केले मला पायलट व्हायचे आहे.

सुरूवातीला तिच्या या इच्छेला नकार मिळाला. हे शिक्षण आपल्या आवाक्याबाहेर असल्याचे वडिलांनी स्पष्ट सांगितले. मात्र सिद्धीची जिद्द, चिकाटी आणि आत्मविश्वास कायम राहिला. आई, मावशी,चुलते आणि काका यांच्या माध्यमातून तिने आपल्या स्वप्नाचा पाठपुरावा केला व त्यानंतर मुंबई येथील एका नामांकित अकॅडमीत तिने ग्राउंड क्लासेस पूर्ण केले. पुढे त्यांच्या मार्गदर्शनाखाली अमेरिकेतील फ्लोरिडा येथील प्रतिष्ठित वैमानिक प्रशिक्षण संस्थेत प्रवेश घेतल्यानंतर अडीच वर्षे आई-वडील आणि कुटुंबीयांपासून दूर राहून तिने कठोर प्रशिक्षण घेतले. अथक परिश्रम, समर्पण आणि जिद्दीच्या बळावर तब्बल २८ महिन्यांत तिने आपले ध्येय गाठले. अंतिम पायलट परीक्षा यशस्वीरित्या उत्तीर्ण होत तिने अक्षरशः आकाशाला गवसणी घातली.

सिद्धीचा हा प्रवास केवळ वैयक्तिक यशाचा नाही, तर स्वप्नांवर विश्वास ठेवून सातत्याने प्रयत्न करणाऱ्या प्रत्येक युवक-युवतीसाठी प्रेरणादायी आहे. तिच्या या यशामुळे तिच्या माता-पित्यांसह राजुरी गावाची आणि संपूर्ण जुन्नर तालुक्याची मान अभिमानाने उंचावली आहे.

# क्यों काले होते हैं अफ्रीका के लोग?

## श्राप नहीं, भगवान ने दिया है आशीर्वाद, जान बचा लेता है काला रंग!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

भारत में हर रंग के लोग देखने को मिलते हैं। कोई गोरा होता है, कोई सांवला और किसी का रंग काला होता है। लेकिन अक्सर देखने को मिलता कि अफ्रीका के लोग काले रंग के होते हैं। क्या आपको इसके पीछे की वजह पता है?

भारत में आपको हर रंग के लोग मिल जाएंगे गोरे, गेहुंआ, सांवले और काले। लेकिन जब बात अफ्रीका की आती है तो ज्यादातर लोग गहरे काले रंग के क्यों दिखते हैं? कई लोग इसे श्राप या दुर्भाग्य समझते हैं, लेकिन असलियत बिल्कुल उलट है। वैज्ञानिकों के अनुसार काला रंग अफ्रीका के लोगों के लिए भगवान का आशीर्वाद है। यह उनकी त्वचा को वहां की तेज और खतरनाक धूप से बचाता है।



### मेलेनिन है असली हीरो

हमारी त्वचा का रंग मेलेनिन नामक पिगमेंट से तय होता है। मेलेनिन जितना ज्यादा, रंग उतना गहरा होता है। अफ्रीका में सूरज की किरणें बहुत तेज होती हैं। वहां यूवी किरणों की मात्रा बहुत अधिक है। मेलेनिन इन खतरनाक किरणों को सोख लेता है और त्वचा को स्किन कैंसर, झुर्रियों और अन्य नुकसान से बचाता है। यही वजह है कि अफ्रीकी मूल के लोगों में स्किन कैंसर की दर बहुत कम है। लाखों साल पहले जब मानव अफ्रीका से निकलकर दुनिया के दूसरे हिस्सों में फैला, तब अलग-अलग जलवायु के अनुसार उनका रंग भी बदलता गया। जहां धूप कम थी, वहां मेलेनिन कम हुआ और रंग गोरा होता गया। लेकिन अफ्रीका में जहां सूरज सीधा और तेज है, वहां मेलेनिन ज्यादा बना रहा। यह प्रकृति का अनोखा इंतजाम है। काला रंग सिर्फ रंग नहीं, सुरक्षा कवच है।

### क्या-क्या फायदा

मेलेनिन तेज यूवी किरणों से डीएनए को बचाता है। इसकी वजह से स्किन कैंसर का खतरा कम होता है। साथ ही ये शरीर में विटामिन डी के संतुलन में मदद करता है। इसकी वजह से गर्मी में भी त्वचा को स्वस्थ रहती है। अध्ययनों में पाया गया है कि गहरे रंग की त्वचा वाले लोग तेज धूप में ज्यादा देर तक बिना नुकसान के रह सकते हैं। यही उनका प्राकृतिक आशीर्वाद है। विकासवाद के अनुसार, अफ्रीका मानव सभ्यता का उद्गम स्थल है। यहां की जलवायु के अनुकूल होने के लिए काला रंग सबसे उपयुक्त था। जब इंसान यूरोप और एशिया की ओर बढ़ा, जहां धूप कम थी और ठंड ज्यादा, तो शरीर को ज्यादा विटामिन डी की जरूरत पड़ी. इसलिए मेलेनिन कम हुआ और रंग गोरा हो गया। यह पूरी प्रक्रिया हजारों सालों में हुई।

### आज के समय में महत्व

आधुनिक समय में भी काला रंग फायदेमंद साबित हो रहा है। ग्लोबल वार्मिंग और बढ़ती यूवी किरणों के बीच गहरे रंग वाले लोग ज्यादा सुरक्षित हैं। हालांकि हर रंग सुंदर है और हर रंग की अपनी खूबियां हैं। गोरे रंग वाले लोग ठंडे इलाकों में बेहतर ढल पाते हैं। भारत में भी विभिन्न रंगों के लोग हैं क्योंकि हमारी भौगोलिक स्थिति विविध है। उत्तर में गोरे, दक्षिण में गहरे रंग वाले लोग होते हैं। यह हमारी विविधता है।

शांत - चांगल्या झोपेसाठी चांगला पलंग नव्हे
तर चांगली गादी आवश्यक आहे.
सर्वोत्तम क्वालिटीच्या गादी साठी




एकमेव ४५ वर्षांचा समृद्ध अनुभव असलेले शोरुम
सीमा हॅण्डलूम हॉउस पारोला रोड, धुळे






# अधिक मास शिवरात्री कधी आहे? १२ की १३ जून?



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

हिंदू पंचांगानुसार सध्या ज्येष्ठ अधिक मासाचा पवित्र काळ सुरू आहे. अधिक मासात येणाऱ्या मासिक शिवरात्रीला विशेष धार्मिक महत्त्व आहे. यावर्षी ही तारीख अत्यंत दुर्मिळ आणि शुभ मानली जात आहे. कारण २७ वर्षांनंतर याच दिवशी अनेक महासंधी येत आहेत. तर यावर्षी अधिक मास शिवरात्री कधी आहे आणि जलाभिषेकाची वेळ काय आहे? सर्वकाही जाणून घेऊया.

मासिक शिवरात्री प्रत्येक महिन्याच्या कृष्ण पक्षातील चतुर्दशीला साजरी केली जाते. वैदिक पंचांगानुसार ज्येष्ठ अधिक मासाची (ज्येष्ठ महिन्याची) चतुर्दशी तिथी शनिवार, दि. १३ जून २०२६ रोजी दुपारी ४:०७ वाजता सुरू होईल आणि रविवार, दि. १४ जून रोजी दुपारी १२:१९ पर्यंत राहील. धार्मिक शास्त्रानुसार प्रदोष काळात शिवरात्रीचा उपवास आणि पूजा करणे सर्वोत्तम मानले जाते. त्यामुळे उदय तिथीवर प्रदोष काळाचे महत्त्व लक्षात घेता अधिक मासातील मासिक शिवरात्री शनिवार, दि. १३ जून २०२६ रोजी साजरी केली जाईल.

### ३ महासंयोगाचा महासंगम... शनिदेवाचा आशीर्वाद आणि शिवाची भक्ती...

पंचांगानुसार यावर्षी शनिवार, दि. १३ जून रोजी शिवरात्री आल्याने शनिदेवांचा आशीर्वाद आणि भगवान शिव यांची भक्ती यांचा एक अद्भुत संगम होतो. ज्यामुळे साडेसाती किंवा ढैयाच्या दुःखातून मुक्ती मिळते. ज्योतिषशास्त्रानुसार या दिवशी 'गौरी योग' तयार होत असतो, जो वैवाहिक सुख आणि सुदैवासाठी अत्यंत शुभ मानला जातो. पुरुषोत्तम मासात केलेल्या पूजेचे फळ सामान्य दिवसांपेक्षा कित्येक पटीने अधिक मानले जाते. आत्मसाक्षात्कार आणि मोक्षासाठी हा काळ सर्वोत्तम आहे.

### अधिक मास शिवरात्री भाग्यशाली राशी...

**सिंह :** या राशीच्या व्यक्तींसाठी हा दिवस आत्मविश्वास आणि यश घेऊन येऊ शकतो. नोकरीत वरिष्ठांचे सहकार्य मिळेल. व्यवसायात नवीन संधी मिळू शकतात. आर्थिक लाभाचे संकेत असून समाजात मान-सन्मान वाढू शकतो.

**तूळ :** या राशीला भाग्याची उत्तम साथ मिळू शकते. रखडलेली कामे पूर्ण होतील. आर्थिक व्यवहारांमध्ये फायदा होईल. प्रेमसंबंध आणि वैवाहिक जीवनात आनंदाचे वातावरण राहील.

**धनु :** या राशीच्या व्यक्तींना करिअरमध्ये प्रगतीची संधी मिळू शकते. शिक्षण, प्रवास आणि परदेशाशी संबंधित कामांमध्ये यश मिळण्याचे योग आहेत. आर्थिक स्थितीत सुधारणा होईल.

**मेष :** या राशीसाठी हा दिवस नवीन संधी घेऊन येऊ शकतो. कामाच्या ठिकाणी तुमच्या कल्पनांचे कौतुक होईल. उत्पन्न वाढण्याची शक्यता आहे. कुटुंबातील वातावरणही आनंदी राहील.

**मीन :** या राशीच्या व्यक्तींना मानसिक समाधान आणि आर्थिक लाभ मिळू शकतो. धार्मिक किंवा आध्यात्मिक कार्यांमध्ये रुची वाढेल. नोकरी आणि व्यवसायात सकारात्मक परिणाम दिसून येतील.

### जलाभिषेक आणि पूजेची योग्य वेळ कोणती?

जर तुम्ही अधिक मासात शिवरात्रीला पूजा करत असाल, तर जलाभिषेकासाठी शुभ वेळ जाणून घ्या.
**निशित काळ :** रात्री ११:०१ ते १२:४१ पर्यंत
**ब्रह्म मुहूर्त :** पहाटे ४:०२ ते ४:४२ पर्यंत
**अभिजीत मुहूर्त :** दुपारी ११:५३ ते १२:४९ पर्यंत

### पूजेचे महत्त्व

शिवपुराणानुसार अधिक मासात भगवान शिव यांची पूजा केल्याने केवळ मानसिक शांतीच मिळत नाही, तर जीवनातील सर्व नकारात्मक अडथळेही दूर होतात. या दिवशी शिवलिंगावर गंगाजल, कच्चे दूध, मध, दही आणि तूप यांचा अभिषेक करावा. 'ओम नमः शिवाय' या मंत्राचा जप करत बेलपत्र, धोतरा आणि पांढरे चंदन अर्पण करणे अत्यंत शुभ मानले जाते.



## हे आहेत शनीदेवांचे ९ वाहन, तुमच्यासाठी कोणते लकी आणि कोणते अनलकी?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

शनी चालीसामध्ये शनिदेवाच्या ७ वाहनांविषयी सांगण्यात आले आहे. शास्त्रानुसार शनिदेव ज्या वाहनावर स्वर होऊन एखाद्या व्यक्तीच्या राशीमध्ये प्रवेश करतात, त्यानुसार त्याला चांगल्या-वाईट फळाची प्राप्ती होते. नक्षत्र वार आणि तिथीची गणना करून शनीच्या वाहनाविषयी समजू शकते. या व्यतिरिक्त शनिदेवाची इतरही वाहन आहेत.
शनिदेवाचे वाहन याप्रमाणे आहेत...
**वाहन प्रभु के सात सुजाना। दिग्गज, गर्दभ, मृग, अरुस्वाना।।**
**जम्बुक, सिंह आदि नखधारी। सो फल ज्योतिष कहत पुकारी।।**

**वाहन – हत्ती**
फळ शास्त्रानुसार, शनिदेव हत्तीवर स्वार होऊन आले तर त्यांच्यासोबत धनाची देवी लक्ष्मीचे आगमन होते.

**वाहन – लांडगा**
शनिदेव लांडग्यावर स्वार होऊन आले तर व्यक्तीची बुद्धी नष्ट होते, धन आणि यशाचासुद्धा नाश होतो.

**वाहन – हरीण**
शनिदेव हरणावर स्वार होऊन आले तर मृत्यूसमान कष्ट सहन करावे लागतात. सवकीही नष्ट होते.

**वाहन – गाढव**
शनि गाढवावर स्वार होऊन एखाद्याच्या राशीत प्रवेश करत असतील तर त्याचे पूर्ण होत आलेले कामही नष्ट होते.

**वाहन – श्वान**
शनिदेव श्वानावर स्वार होऊन आल्यास अत्यंत भय आणि दुःख होते. घरात चोरीची भीती राहते.

**वाहन – गिधाड**
शनिदेव गिधाडावर स्वार होऊन आले तर व्यक्ती अनेक रोगांनी ग्रस्त होतो.

**वाहन – म्हैस**
शनिदेव म्हशीवर स्वार होऊन आले तर धन-धान्य समृद्धी प्राप्त होते. दाम्पत्य वृद्धी आणि चिंतामुक्त होते.

**वाहन – कावळा**
शनिदेव कावळ्यावर स्वार होऊन आले तर सर्व रोग आणि दुःख दूर होतात.

**वाहन – सिंह**
शनि सिंहावर स्वार होऊन आल्यास राजकारणात प्रसिद्धी आणि समाजात मान-सन्मान मिळतो.

# भारतातील ५ रहस्यमय मंदिरे
## जी एका रात्रीत बांधले गेल्याचे मानले जाते

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

देशाच्या विविध भागांतील अनेक मंदिरे केवळ त्यांच्या स्थापत्यकलेसाठीच नव्हे, तर लोकांना आकर्षित करणाऱ्या त्यांच्याभोवतीच्या गूढ कथांसाठीही प्रसिद्ध आहेत. या मंदिरांपैकी, स्थानिक समजुतीनुसार ती एका रात्रीत बांधली गेली. या कथांसाठी ऐतिहासिक पुरावे नसले तरी, या कथा लोकांच्या श्रद्धेला आणि जिज्ञासेला प्रेरणा देत राहतात.



### वैद्यनाथ धाम, झारखंड

झारखंडमधील देवघर येथे असलेले वैद्यनाथ धाम, हे भगवान शिवाच्या १२ ज्योतिर्लिंगांपैकी एक आहे. पौराणिक कथेनुसार, रावणाला भगवान शिवाला लंकेला घेऊन जायचे होते आणि त्यासाठी तो एक शिवलिंग घेऊन जात होता. वाटेत, काही परिस्थितीमुळे ते शिवलिंग देवघर येथे स्थापित झाले. त्यानंतर, दैवी वास्तुविशारद विश्वकर्मा यांनी येथे एका रात्रीत एक भव्य मंदिर बांधले. यामुळेच या मंदिराला विशेष महत्त्व आहे.

### गोविंद देव मंदिर, वृंदावन

वृंदावनमधील गोविंद देव मंदिर त्याच्या अनोख्या आख्यायिकेसाठीही प्रसिद्ध आहे. स्थानिक मान्यतेनुसार, देवांनी भगवान विष्णूच्या सन्मानार्थ रातोरात या मंदिराचे बांधकाम सुरू केले. तथापि, सूर्योदयापूर्वी बांधकाम पूर्ण होऊ शकले नाही. असे म्हटले जाते की यामुळेच मंदिराचे काही भाग अपूर्ण राहिले, जे आजही लोकांमध्ये चर्चेचा विषय आहे.

### काकनमठ मंदिर, मोरेना

मध्य प्रदेशातील मोरेना जिल्ह्यात असलेले काकनमठ मंदिर त्याच्या अनोख्या रचनेसाठी आणि गूढतेसाठी ओळखले जाते. लोककथेनुसार, हे मंदिर भुतांनी एका रात्रीत बांधले होते. तथापि, पहाटेपूर्वी बांधकाम पूर्ण होऊ शकले नाही आणि मंदिर अपूर्ण राहिले. असे असूनही, हे मंदिर त्याच्या अद्भुत रचनेमुळे आजही पर्यटक आणि भाविकांना आकर्षित करते.

### भोजेश्वर मंदिर, भोजपूर

भोजपूरमधील भोजेश्वर मंदिराविषयी अनेक मनोरंजक समजुती प्रचलित आहेत. असे म्हटले जाते की, वनवासाच्या काळात पांडवांनी भगवान शिवाच्या सांगण्यावरून हे मंदिर बांधण्याचा निश्चय केला. असे मानले जाते की, त्यांनी रातोरात मंदिर पूर्ण करण्याचा प्रयत्न केला, परंतु सूर्योदयापूर्वी काम पूर्ण झाले नाही. मंदिरात स्थापित केलेले विशाल शिवलिंग हे त्याचे सर्वात प्रमुख वैशिष्ट्य मानले जाते.

### हाथिया देवल मंदिर, उत्तराखंड

उत्तराखंडच्या पिथोरगड जिल्ह्यात असलेल्या हाथिया देवल मंदिराची कथा अनोखी आहे. असे म्हटले जाते की, एका हाताच्या कारागिराने हे मंदिर एका रात्रीत एकट्याने कोरले. आख्यायिकेनुसार, अंधारात काम करत असताना शिवलिंगाची दिशा उलट झाली, त्यामुळे येथे नियमित पूजा केली जात नाही. ही अनोखी कथा आजही लोकांना आश्चर्यचकित करते.

# हनुमानजींची जन्म कथा

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

भगवान हनुमानजींच्या जन्माची कथा श्रीरामांच्या जन्माशी निगडित आहे. हनुमानजींचे वडील केसरी आणि आई अंजनी हे वानर होते. अंजनी आपल्याला मुल व्हावे म्हणुन महादेवाची पूजा करत होती.



अयोध्येचा राजा दशरथ आणि त्याच्या तीन राण्या हे सुद्धा आपल्याला मुल व्हावे म्हणुन देवाची प्रार्थना करत होते. त्यांनी आपल्या गुरूंच्या सांगण्याप्रमाणे पुत्रकामेष्टी यज्ञ केला. या यज्ञाचा प्रसाद म्हणुन तिन्ही राण्यांना देवाकडुन फळ मिळाले.

राणी कैकेयीच्या हाती आलेले फळ एक घार घेऊन पळाली. पण उडताना तिच्या हातुन ते दिव्य फळ निसटले. हेच फळ वाऱ्याने अंजनीच्या हातात पडले. आजूबाजूला त्या फळाचे झाड नसताना आपोआप आपल्या हाती आलेले फळ तिने देवाचा प्रसाद म्हणुन श्रद्धेने ग्रहण केले. अयोध्येत सुमित्रेने आपले फळ कैकेयीसोबत वाटून खाल्ले. त्या दिव्य फळाच्या प्रभावाने अयोध्येत तिन्ही राण्या आणि अंजनी या सर्वांना मुले झाली.

केसरी व अंजनी यांना जो मुलगा झाला, त्याचे नाव ठेवले मारुती. मरुत म्हणजे वारा किंवा वायु. वाऱ्यामुळे म्हणजेच वायुदेवाच्या शक्तीमुळे ते फळ अंजनीच्या हातात आले, त्यामुळे मारुतीला वायुपुत्र असेही म्हणतात. शंकराच्या कृपेने झालेला हा बलवान मारुती, रुद्रावतार असल्याचीही श्रद्धा आहे.


मारुती अत्यंत शक्तिशाली होते. एक दिवस सूर्य उगवताना त्याचे तांबडे सूर्यबिंब पाहुन मारुतीला ते सुंदर पिकलेले फळ वाटले आणि त्यांनी सूर्याच्या दिशेने झेप घेतली. त्यांना अडवायला देवांचा राजा इंद्र याला आपले वज्र वापरावे लागले. या वज्रप्रहाराने मारुतींच्या हनुवटीला लागले आणि ती थोडी वाकडी झाली. त्यामुळे मारुतींचे एक नाव हनुमान असेही पडले. मारुतींची अनेक नावे किंवा बिरुदे आहेत आहेत. केसरीचा मुलगा म्हणुन केसरीनंदन, अंजनीचा मुलगा असल्यामुळे आंजनेय, वायूच्या कृपेने झाल्यामुळे वायुपुत्र. बजरंग, हनुमंत हि इतर नावे सुद्धा आहेत.

# भगवान हनुमानजींची १०८ नावे

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

भगवान मारुती, हिंदू धर्मातील महत्त्वपूर्ण ग्रंथ रामायणात एक पौराणिक चरित्र आहे. शिव पुराणानुसार भगवान हनुमानाला महादेवाचा दहावा अवतार मानले गेले आहे. रामायणानुसार भगवान हनुमान रामाचा परम भक्त, मित्र, दूत इत्यादी होता. ज्याने सुग्रीव इत्यादी वानरांना रावणाशी युद्ध करण्यासाठी रामाचा साथ दिला. रामायण कालात सीतेचा शोध करत लंकेत गेला. रावणाला आपल्या पराक्रमातून भयभीत केले आणि लंका दहन केली. रामायणाच्या सुंदर काण्डमध्ये लंकेतून परतताना अरिष्ट पर्वताहून उडीमारून समुद्र पार केला होता.

१.आंजनेया : अंजनाचा पुत्र
२.महावीर : सर्वात बहादुर
३.हनूमत : ज्याचे गाल फुललेले आहे
४.मारुतात्मज : पवन देवासाठी रत्न सारखे प्रिय
५.तत्वज्ञानप्रद : बुद्धी देणारा
६.सीतादेविमुद्राप्रदायक : सीताची अंगठी रामाला देणारा
७.अशोकवनकाच्छेत्रे : अशोक बागेचा विनाश करणारा
८.सर्वमायाविभंजन : छलचा विनाशक
९.सर्वबन्धविमोक्त्रे : मोह दूर करणारा
१०.रक्षोविध्वंसकारक : राक्षसांचा वध करणारा
११.परविद्या परिहार : दुष्ट शक्तींचा नाश करणारा
१२.परशौर्य विनाशन : शत्रूच्या शौर्याला खंडित करणारा
१३.परमन्त्र निराकर्त्रे : राम नावाचा जप करणारा
१४.परयन्त्र प्रभेदक : शत्रूंचा नाश करणारा
१५.सर्वग्रह विनाशी : ग्रहांच्या खराब प्रभावांचा खात्मा करणारा
१६.भीमसेन सहायकृथे : भीमचा सहायक
१७.सर्वदुखः हरा : दुखांना दूर करणारा
१८.सर्वलोकचारिणे : सर्व जागेवर वास करणारा
१९.मनोजवाय : ज्याची गती वाऱ्या सारखी आहे
२०.पारिजात द्रुमूलस्थ : प्राजक्ताच्या झाडाखाली वास करणारा
२१.सर्वमन्त्र स्वरूपवते : सर्व मंत्राचा स्वामी
२२.सर्वतन्त्र स्वरूपिणे : सर्व मंत्र आणि भजनाचा आकारा सारखा
२३.सर्वयन्त्रात्मक : सर्व यंत्रांमध्ये वास करणारा
२४.कपीश्वर : वानरांचा देवता
२५.महाकाय : विशाल रूप असणारा
२६.सर्वरोगहरा : सर्व रोगांना दूर करणारा
२७.प्रभवे : सर्वात प्रिय
२८.बल सिद्धिकर : परिपूर्ण शक्ती असणारा
२९.सर्वविद्या सम्पत्तिप्रदायक : ज्ञान आणि बुद्धि प्रदान करणारा
३०.कपिसेनानायक : वानर सेनेचा प्रमुख
३१.भविष्यथ्चतुराननाय : भविष्यात घडणाऱ्या प्रसंगांचा ज्ञाता
३२.कुमार ब्रह्मचारी : युवा ब्रह्मचारी
३३.रत्नकुण्डल दीप्तिमते : कानात मणियुक्त कुंडल धारण करणारा
३४.चंचलद्वाल सन्नद्धलम्बमान शिखोज्वला : ज्याची शेपूट त्याच्या डोक्यहूनही ऊंच आहे
३५.गन्धर्व विद्यातत्वज्ञ : आकाशीय विद्याचा ज्ञाता
३६.महाबल पराक्रम : महान शक्तिचा स्वामी
३७.काराग्रह विमोक्त्रे : बंदिवासातून मुक्त करण्यासाठी
३८.शृन्खला बन्धमोचकः तणाव दूर करणार
३९.सागरोत्तारक : महासागर ओलांडारा सशक्त
४०.प्राज्ञाय : विद्वान
४१.रामदूत : रामाचा राजदूत
४२.प्रतापवते : वीरतेसाठी प्रसिद्ध
४३.वानर : वानर



४४.केसरीसुत : केसरी पूत्र
४५.सीताशोक निवारक : सीताचे दुख दूर करणारा
४६.अन्जनागर्भसम्भूता : अंजनीच्या गर्भातून जन्म घेणारा
४७.बालार्कसद्रशानन : सूर्यासारखा तेज
४८.विभीषण प्रियकर : विभीषणाचा हितैषी
४९.दशग्रीव कुलान्तक : रावणाच्य राजवंशाचा नाश करणारा
५०.लक्ष्मणप्राणदात्रे : लक्ष्मणाचे प्राण वाचवणारा
५१.वज्रकाय : धातू सारखे मजबूत शरीर
५२.महाद्युत : सर्वात तेज
५३.चिरंजीविने : अमर रहणारा
५४.रामभक्त : रामाचा परम भक्त
५५.दैत्यकार्य विघातक : राक्षसांच्या सर्व उपक्रमाला नष्ट करणारा
५६.अक्षहन्त्रे : रावणाचा पुत्र अक्षयाचा अंत करणारा
५७.कांचनाभ : सोनेरी रंगाचे शरीर
५८.पंचवक्त्र : पाच मुख असणारा
५९.महातपसी : महान तपस्वी
६०.लन्किनी भंजन : लंकिनीचा वध करणारा
६१.श्रीमते : प्रतिष्ठित
६२.सिंहिकाप्राण भंजन : सिंहिकाचे प्राण घेणारा
६३.गन्धमादन शैलस्थ : गंधमादन पर्वत पार निवास करणारा
६४.लंकापुर विदायक : लंकादहन करणारा
६५.सुग्रीव सचिव : सुग्रीवाचा मंत्री
६६.धीर : वीर
६७.शूर : साहसी
६८.दैत्यकुलान्तक : राक्षसांचा वध करणारा
६९.सुरार्चित : देवतांद्वारे पूजनीय
७०.महातेजस : अधिकांश दीप्तिमान
७१.रामचूडामणिप्रदायक : रामाला सीतेचा चूड़ा देणारा
७२.कामरूपिणे : अनेक रूपं धारण करणारा
७३.पिंगलाक्ष : गुलाबी डोळे असणारा
७४.वार्धिमैनाक पूजित : मैनाक पर्वताद्वारे पूजनीय
७५.कबलीकृत मार्ताण्डमण्डलाय : सूर्याला गिळणारा
७६.विजितेन्द्रिय : इंद्रियांना शांत ठेवणारा
७७.रामसुग्रीव सन्धात्रे : राम आणि सुग्रीवमध्ये मध्यस्थी असणारा
७८.महारावण मर्धन : रावणाचा वध करणारा
७९.स्फटिकाभा : एकदम शुद्ध
८०.वागधीश : प्रवक्तेचा देव
८१.नवव्याकृतपण्डित : सर्व विद्यांमध्ये निपुण
८२.चतुर्बाहवे : चार भुजा असणारा
८३.दीनबन्धुरा : दुःखी लोकांचा रक्षक
८४.महात्मा : देव
८५.भक्तवत्सल : भक्तांची रक्षा करणारा
८६.संजीवन नगाहर्त्रे : संजीवनी आणणारा
८७.सुचये : पवित्र
८८.वाग्मिने : वक्ता
८९.दृढव्रता : कठोर तप करणारा
९०.कालनेमि प्रमथन : कालनेमिचे जीव घेणारा
९१.हरिमर्कट मर्कटा : वानरांचा ईश्वर
९२.दान्त : शांत
९३.शान्त : रचना करणारा
९४.प्रसन्नात्मने : हंसमुख
९५.शतकन्टमदापहते : शतकंटाच्या अहंकाराला ध्वस्त करणारा
९६.योगी : महात्मा
९७.मकथा लोलाय : श्रीरामाची कथा ऐकण्यासाठी व्याकुल
९८.सीतान्वेषण पण्डित : सीतेचा शोध करणारा
९९.वज्रद्रनुष्ट : भावनांवर नियंत्रण करणारा
१००.वज्रनखा : वज्रासारका मजबूत नख
१०१.रुद्रवीर्य समुद्भवा : महादेवाचाअवतार
१०२.इन्द्रजित्प्रहितामोघब्रह्मास्त्र विनिवारक : इंद्रजीताच्या ब्रह्मास्त्रच्या प्रभावाला नष्ट करणारा
१०३.पार्थ ध्वजाग्रसंवासिने : अर्जुनाच्या रथावर विराजमान राहणारा
१०४.शरपंजर भेदक : तीरांच्या घोंसल्याला नष्ट करणारा
१०५.दशबाहवे : दहा भुजा असणारा
१०६.लोकपूज्य : ब्रह्मांडाच्या सर्व जिवांद्वारे पूजनीय
१०७.जाम्बवत्प्रीतिवर्धन : जाम्बवतचा प्रिय
१०८.सीताराम पादसेवा : राम आणि सीतेच्या सेवेत तल्लीन राहणारा